# छत्रपती शिवाजी महाराज आणि तत्कालीन दुष्काळाची स्थिती - एक अभ्यास (इ.स. १६३० - इ.स. १६३७)

*प्रा. अंकुश वाघमारे, एम.ए. एम.एड्. एम.फिल., संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

Received: 10/01/17 | Edited: 19/01/17 | Accepted: 25/01/17 | Area: History

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माच्या वेळी महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला होता. या दुष्काळामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हाहाकार माजला होता. याला थोरला दुष्काळ देखील म्हणतात. परकीय प्रवाशांनी या दुष्काळाच्या संदर्भात खूप माहिती दिली आहे. १६३० चा दुष्काळ महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासातील एक अपूर्व घटना होती. या दुष्काळाचे परिणाम महाराष्ट्रातील लोकांना दीर्घकाळ पर्यत भोगावे लागेल. बादशहानाम्यातील उल्लेखाप्रमाणे या दुष्काळाकडे दक्षिण प्रदेश निदान एक पिढीपर्यंत दरिद्री राहिला. बादशहानाम्यातील उल्लेखाप्रमाणे या दुष्काळाकडे दक्षिण प्रदेश निदान एक पिढीपर्यंत दरिद्री राहिला. बादशहानाम्यात या दुष्काळाचे भेदक वर्णन केले आहे. भाकरीच्या तुकडयासाठी लोक स्वत:ला विकण्यास तयार होते. परंतु विकत घेणारा कोणी नव्हता. एका भाकरीस लोक आपल्या पदाचा त्याग करण्यासाठी तयार होत. १) परंतु त्यांची कोणत्याही पूर्वा तव्हती. शेवटी दारिद्रय इतके शिंगेला पोहचले की, माणसे माणसाला खावू लागली. पुत्रप्रेमापेक्षा त्याचे मांस पित्याला प्रिय वाटू लागले.

प्रादेशिक साधनाची छाननी केल्यास महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरुप भेसूर होते असे दिसून येईल. महाराष्ट्र आणि गुजरात या दोन भागावर दुष्काळोचे फार अनिष्ट परिणाम झाले होते. इंग्लिश फॅक्ट्री रेकॉर्डमध्ये नमूद केले आहे की, दुष्काळ इतका तीव्र स्वरुपाचा होता की देशाच्या इतिहासात त्याला तोड सापडणार नाही. अवर्षणामुळे जी धान्य टंचाई झाली. तेच या दुष्काळाचे कारण होते. कौटुंबिक जीवनाचे विघटन झाले होते. अन्नासाठी लोकांना दाही दिशांना भटकावे लागत होते. लोक झाडाचा पाला खावू लागली. परकीय प्रवाशांच्या मते लोकांनी झाडावरील पाला खाल्याने झाडावर एकही पान दिसत नव्हते. जिकडे तिकडे लोक अन्नासाठी माणसालाच खावू लागली. माणसाचे व प्राण्यांचे मृत्यूचे ढिग जिकडे तिकडे दिसत होते. इतका दुष्काळाने कहर केला होता. लोक स्वत: गुलाम म्हणून विकू न घेऊ लागले. वि. का. राजवाडे यांनी या दुष्काळाचे संदर्भात राधा माधव विलास चंपू च्या प्रस्तावाने च्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, गोदातिरी अवर्षणाने भयंकर दुष्काळ पडला. लहान होनास दोन शेर दोन मिळत होती. परमानंदाच्या शिवभारतामध्ये देखील १६३० च्या दुष्काळाचे वर्णन आहे. त्यांच्या मते जीवन जगण्यापुरते धान्य न मिळाल्यामुळे सर्वत्र हाहाकार निर्माण झाला होता. पशु पशुस व माणसे माणसास खावू लागली. याची सर्व परिस्थिती कवी परमानंद यांनी शिवभारत अध्याय ८ मध्ये केली आहे. यावरुन दुष्काळाची दाहकता आपल्याला दिसून येते.२)

तत्कालीन संत साहित्यात देखील या दुष्काळाचे वर्णन आहे. रामदासांनी या दुष्काळाचे वर्णन फार ऱ्हदयद्रावक केले आहे. पाऊस पडला नाही म्हणून सर्वत्र टंचाई निर्माण झाली. लोकांवर उपासमारीची वेळ आली. कित्येक मरण पावले.३) भिक्षा मागणारे लोक परंतु भिक्षा कोणी देत नव्हते. तुकाराम महाराजांच्या समकालीन दुष्काळाचे चित्रण आहे. दुष्काळामुळे लोकांना आपली वतने विकून कसे वणवण फिरावे लागले याचे वर्णन कागदपत्रावरुन मिळते. गुजराज ते गोवळकोंडा हा संपूर्ण प्रदेश एक मोठी स्मशानभूमी बनला होता. असे इंग्लिश फॅक्ट्री रेकॉर्ड मध्ये म्हटले आहे. ४) एक तत्कालीन व्यापारी म्हणतो, लोकांची एकच मागणी होती आम्हाला अन्न द्या किंवा मारुन टाका यावरुन असे दिसून येते की या दुष्काळाकडे संपूर्ण ग्रामीण जीवन उध्वस्त झाले होते. गुलामगिरी, कमालीचे दारिद्रय, महागाई, उपासमार अशा प्रकारच्या दुष्काळाच्या भीषण परिणामांना मराठी सत्ता आपल्या उदयाच्या काळात तोंड देत होती. ५) शिवाजी महाराजांचा जन्म महाराष्ट्राचा या विपननावस्थेच्या काळात झाला होता. काळाने त्यांना एक प्रकारेच आव्हान दिले होते. ६) या पर्श्वभूमीवर शिवचरित्राचा अभ्यास केला असतो त्यांच्या कार्याची थोरवी पटेल.

अशा स्थितीत दुष्काळाच्या काळत्त परागंदा झालेल्या लोकांना परत आणण्याचे अधिक जमीन शेतीखाली आणण्याचे प्रयत्न शिवकाळात झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात या दुष्काळाने सर्वत्र हाहाकार माजवला होता. ७) संपूर्ण जनजीवन विस्काळीत झाले होते. अशा कठीण काळात शिवाजी महाराज यांचे

शिक्षण व बालपण झाले. एकंदर हा कालखंड भयंकर अस्थिरतेचा होता. हे दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची**


१) कुलकर्णी अ. रा. - शिवकालीन महाराष्ट्र पृ. क्र. ४४.

२) राजवाडे वि. का, - राधामाधव विलास चंपूची प्रस्तावना.

३) परमानंद - शिवभारत - अध्याय पृ.क्र. ५३

४) कित्त - पृ. क्र. ५५ ज़ ५६

५) कुलकर्णी अ. रा. - शिवकालीन महाराष्ट्र पृ. क्र. ३४६

६) कित्ता - पृ. क्र. ३४७

७) खरे ग. ह. - शिवाजी आणि शिवकाल पृ.क्र. ३५७